ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख १४ ऑगस्ट, १९५७ | अंक ३३ .

## विविध माहिती

**निर्वासितांची सोय लावण्यासाठी**—पूर्व पाकिस्तानांतून पश्चिम बंगालमध्यें आलेल्या निर्वासितांची सोय करण्यासाठी गेल्या दोन वर्षांत ३१ कोटी रुपये खर्च करण्यांत आले. आतां-पर्यंत ह्या कामासाठीं १०० कोटींहून अधिक रक्कम खर्च झाली आहे. निर्वासितांच्या वसाहतींवर सरकार दरसाल ७ कोटी रुपये खर्च करीत आहे. रोज दोन लाख रुपये, असें खर्चाचें प्रमाण आहे.

**जपानी उद्योगपतींची विचारणा**—जपानी उद्योगपति मि. तेशी मोटो ह्यांनीं केरळच्या उद्योगमंत्र्यांची भेट घेऊन राज्य सरकारच्या परदेशी कंपन्यांच्या बाबतच्या धोरणाबद्दल चर्चा केली. सरकार जर कांहीं शेअर्स घेण्यास तयार असेल तर राज्यांत उद्योगधंदे काढण्याची तयारी त्यांनीं दाखविली आहे. मि. मोटो ह्यांनीं अर्णाकुलम् येथें खाजगी भांडवलाशीं सहकार्य करून विजेच्या तारांचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे.

**विदर्भांतील उद्योगधंदे**—विदर्भ काँग्रेसच्या विकास समितीनें विदर्भाच्या औद्योगिक विकासाविषयीं कांहीं सूचना केल्या आहेत. एका प्रकारच्या गवतापासून कागद तयार करण्याचा कारखाना विदर्भांत काढतां येईल. त्याचप्रमाणें यवतमाळ जिल्ह्यांतील राजुरी या गांवी सिमेंटचा कारखाना निघूं शकेल असें समितीचें म्हणणें आहे.

**गोहटी येथें कारखाना निघूं शकेल**—गोहटी येथें अशुद्ध तेल शुद्ध करण्याचा कारखाना काढणें तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या शक्य आहे, असें मत ह्याबाबतच्या फ्रेंच तज्ज्ञानें व्यक्त केलें आहे. आसामचें सरकार कारखाना काढण्याबाबत त्यांचा सल्ला घेत आहे. तेलाची वहातूक करण्यासाठी ब्रह्मपुत्रा नदीचा उपयोग करतां येईल, असेंहि त्यांनीं सांगितलें.

**अखिल भारतीय मेडिकल कॉन्फरन्स**—अखिल भारतीय मेडिकल कॉन्फरन्सचें ३४ वें अधिवेशन बंगलोर येथें ता. २६, २७ व २८ डिसेंबर रोजीं भरविण्यांत येणार आहे. बंगलोर येथें परिषद भरण्याची ही पहिलीच वेळ आहे. भारताच्या निर-निराळ्या भागांतून सुमारें २,००० प्रतिनिधी परिषदेला हजर राहतील असा अंदाज आहे.

**अफगाण सरकारला मदत**—अफगाणिस्तानांतील छोट्या व ग्रामोद्योगांत काम करणाऱ्या कामगारांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठी सरकारनें औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. अशा संस्थांच्या स्थापनेसाठीं व त्या चालविण्याची व्यवस्था करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारचा एक अधिकारी अफगाणिस्तानला जाणार आहे.

**भिलईच्या कारखान्याची यंत्रसामुग्री**—भिलई येथें काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यासाठी तयार करण्यांत आलेलीं नऊ यंत्रें लवकरच भारतांत येतील. अजून २३ यंत्रें तयार व्हावयाचीं आहेत. त्यांपैकी १५ चालू सालीं व बाकीचीं पुढील सालीं मिळतील. लेनिनग्रॅडमधील एका कारखान्यांत तीं तयार करण्यांत येत आहे.

**चीनमधील औद्योगिक उत्पादन**—चिनी सरकारच्या अधिकृत वृत्तसंस्थेनें असें जाहीर केलें आहे कीं, चीनमधील औद्योगिक उत्पादनांत गेल्या वर्षीं एकतृतीयांशानें वाढ झाली. तथापि, अर्थव्यवस्थेच्या कांहीं विभागांतील उत्पादन ठरल्याप्रमाणें वाढलेलें नाहीं, असेंहि नमूद करण्यांत आलें आहे. गुरांच्या पैदाशीबाबत हें अधिक प्रमाणांत खर आहे.

**अंदमानांत कॉफीची लागवड**—ईंडिअन कॉफी बोर्डानें केलेल्या अहवालांतील माहितीप्रमाणें अंदमान बेटांतील १५,००० एकर जमीन कॉफीची लागवड करण्यास योग्य अशी आहे. जमिनीचा प्रकार, पावसाची अनुकूलता आणि दमट हवा ह्या गोष्टीहि अनुकूल आहेत. ह्या भागांत कांहीं ठिकाणीं प्रयोगा-दाखल कॉफीची लागवड करण्यांत यावी, असें सुचविण्यांत आलें आहे.

**भारत-कॅनडा व्यापार**—ओटावामधील इंडिअन हाय-कमिशनरनें कॅनडामधील बाजारपेठेसंबंधीं अहवाल तयार केला आहे. अहवालांतील माहितीप्रमाणें भारतामधील काथ्याच्या मालाला कॅनडांत चांगली मागणी येऊं शकेल. सध्यां भारताच्या मसाल्याच्या पदार्थांना फारच थोडी मागणी आहे. पण ह्या मालाच्या बाबतींतहि व्यापार वाढविण्यास चांगला वाव आहे असें नमूद करण्यांत आलें आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## बँकांचीं देणीं व येणीं

**( बँकांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांच्या आकाराप्रमाणें वर्गवारी )**

( आंकडे कोटी रुपयांचे )

| बँकेचा आकार ( वसूल भांडवल + रिझर्व्ह ) | बँकांची संख्या | वसूल भांडवल व रिझर्व्ह | ठेवी | सरकारी रोख्यांत इन्व्हेस्टमेंटस | कर्जें |
|---|---|---|---|---|---|
| | ( अ ) | शेड्यूल्ड बँका | | | |
| १. ५ ते ५० लक्ष रु. ... | ४७ | ८.९ | ७८.४ | २७.४ | ४६.४ |
| २. ५० लक्ष रु. चे वर ... | २५ | ५२.१ | ८२८.६ | २९६.३ | ५१०.२ |
| ३. १ व २ चीं बेरीज ... | ७२ | ६१.० | ९०७.० | ३२३.६ | ५५६.६ |
| | ( ब ) बिगर | शेड्यूल्ड बँका | | | |
| ४. ५० हजार रु. चे खालीं ... | १६ | — | ०.१ | — | ०.१ (१००.०) |
| ५. ५० लक्ष रु. ते १ लक्ष रु. ... | ९९ | ०.७ | २.५ | ०.४ | २.० |
| ६. त्यावर ५ लक्ष रु. पर्यंत ... | १७८ | ३.६ | २०.७ | ५.७ | १३.६ |
| ७. त्यावर ५० लक्ष रु. पर्यंत ... | ५७ | ४.६ | २७.२ | ७.७ | १७.४ |
| ८. ५० लक्ष रु. व त्यावर ... | ४ | ३.१ | २२.९ | ११.७ | ९.५ |
| ९. ४ ते ८ ची बेरीज ... | ३५४ | १२.० | ७३.४ | २५.५ | ४२.६ |
| | ( क ) | सर्व बँका | | | |
| १०. ५० हजार रु. चे खालीं ... | १६ | — | ०.१ | — | ०.१ (१००.०) |
| ११. ५० हजार रु. ते १ लक्ष रु. ... | ९९ | ०.७ | २.५ | ०.४ | २.० |
| १२. त्यावर ५ लक्ष रु. पर्यंत ... | १७८ | ३.६ | २०.७ | ५.७ | १३.६ |
| १३. त्यावर ५० लक्ष रु. पर्यंत ... | १०४ | १३.५ | १०५.६ | ३५.१ | ६३.८ |
| १४. ५० लक्ष रु. व त्यावर ... | २५ | ५५.२ | ८५१.५ | ३०७.९ | ५१९.८ |
| १५. १० ते १४ ची बेरीज ... | ४२६ | ७३.१ | ९८०.४ | ३४९.१ | ५९९.२ |

**कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री**—भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि पूर्व जर्मनी ह्यांच्यांतील एका व्यापारी करारावर सह्या करण्यांत आल्या. कराराप्रमाणें पूर्व जर्मनी भारताला १.२ कोटी रुपये किंमतीची कापड गिरण्यांची यंत्र-सामुग्री पुरविणार आहे.

**श्रीरामपूर तालुक्यांत डिस्टिलरी**—सध्यां नाशिक येथें असलेली डिस्टिलरी श्रीरामपूर तालुक्यांतील चितळी ह्या खेडे-गांवांत उभारण्यांत येणार आहे. तालुक्यांतील दहा साखरेच्या कारखान्यांपासून हें गांव मध्यवर्ती असल्यामुळें कारखान्यांतील मळीचा उपयोग डिस्टिलरीला करून घेतां येईल. डिस्टिलरी उभारल्यावर तींत ५,००० लोकांना काम मिळेल.

**दीर्घायुष्याचें रहस्य**—गोध्रा शहरापासून जवळ असलेल्या एका गांवीं श्री. शुक्ल नांवाचे योगी १०५ व्या वर्षी निधन पावले. त्यांच्या मतानें, नियमित वागणुकीनें आणि ठराविक आहारानें कोणाहि माणसाला १०० वर्षांची वयोमर्यादा पार करतां येईल. श्री. शुक्ल रोज योगासनें करीत. ते उत्तम संस्कृतज्ञ व हिंदु धर्माचे अभ्यासक होते.

**म्हैसूर सरकारचें वेअरहौसिंग कॉर्पोरेशन**—म्हैसूर सरकारनें राज्यांत वेअरहौसिंग कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनच्या स्थापनेसाठी १७ लाख रुपये राज्य सरकार देणार असून आणखी तितकीच रकम सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशनकडून मिळणार आहे. राज्यांतील महत्त्वाच्या व्यापारी ठिकाणीं माल सांठविण्यासाठी कॉर्पोरेशनतर्फे गुदामें बांधण्यांत येतील. प्रत्येक गुदामाला १.९५ लाख रुपये खर्च येईल.

**अर्थशास्त्रीय पुस्तकाचें रशिअन भाषांतर**—प्रोफेसर वाडिआ आणि प्रोफेसर मर्चंट ह्यांनीं लिहिलेलें 'आपले आर्थिक प्रश्न' ह्या नांवाच्या भारताच्या अर्थशास्त्रावरील पुस्तकाची रशिअन भाषेंतील आवृत्ति प्रसिद्ध करण्यांत आली आहे. डॉ. रुबिनस्टाईन ह्यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत, पुस्तक रशिअन वाचक आस्थापूर्वक वाचतात, असें म्हटलें आहे.

**मेट्टुर येथें अल्युमिनमचा कारखाना**—मद्रास राज्यांत मेटुर येथें अल्युमिनम तयार करण्याचा कारखाना काढण्याचा विचार चालू आहे. भारत सरकारच्या उद्योगमंत्र्यांशीं ह्या बाबतींत वाटाघाटी करण्यासाठी एका फ्रेंच कंपनीचे तज्ज्ञ भारतांत येणार आहेत. त्यांचा अहवाल आल्यावर पुढील पाऊल उचलण्यांत येईल.

**विजेच्या तारांचा कारखाना**—अर्णाकुलमपासून जवळच विजेच्या तारा व केबल्स तयार करण्याचा कारखाना लवकरच काढण्यांत येणार आहे. कारखाना खाजगी मालकीचा राहणार असून तो उभारण्याच्या कामीं टोकिओच्या एका जपानी कंपनीचें साह्य घेण्यांत येणार आहे. कारखान्याच्या ६० लाख रु. भांडवलांपैकी ४५ टक्के भाग जपानी कंपनीच्या मालकीचे असतील.

**अमेरिकेच्या विद्यापीठांतील विद्यार्थी**—भारत सरकारच्या शिक्षणखात्यानें अमेरिकेंतील विद्यापीठांचें अवलोकन करण्या-साठी २४ शिक्षणज्ज्ञांचें मंडळ अमेरिकेला पाठविलें होतें. तें आतां परत आलें आहे. मंडळाचे एक सदस्य, श्री. चंद्रात्रेय म्हणाले कीं, अमेरिकन विद्यापीठांतील विद्यार्थी आपली कुवत व मर्यादा ओळखून आपला भावी मार्ग निवडण्यास समर्थ असा असतो.

# अर्थ

बुधवार, ता. १४ ऑगस्ट, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ठेवीसाठीं आणि कर्जांसाठीं चढाओढ व ओढाताण

### १९५६ मधील बँकिंगची प्रगति व तिची दिशा

बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ३६ (२) कलमाखालील रिझर्व्ह बँकेचा बँकिंगविषयक १९५६ ह्या वर्षाचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्याचप्रमाणें, १९५६ मधील बँकांविषयक तपशीलवार आंकड्यांचें पुस्तकहि प्रसिद्ध झालें आहे.

**तरतेपणा कमी; नफा जास्त**

१९५५ चे मानानें १९५६ हें वर्ष बँकांना जरा ओढाताणीचें गेलें. सरकारी अंदाजपत्रकांतील मोठी तूट, भांडवल गुंतवणुकीची प्रवृत्ति, बँकांच्या कर्जांतील भयंकर वाढ, हीं १९५६ सालाचीं वैशिष्ट्यें सांगतां येतील. बँकांच्या कर्जांत इतकी वाढ झाली, तरी त्या मानानें ठेवींतील वाढ बेताचीच होती. जनतेजवळील पैशाचा पुरवठा मुख्यत: चलनवाढीमुळेंच झाला, आणि हा पुरवठाहि परराष्ट्रीय देण्या-घेण्यांतील प्रतिकूल तफावतीमुळें मर्यादित राहिला. त्या सर्वांचा परिणाम म्हणजे पैशाची तंगी; त्यामुळें व्याजाचे दर चढीचे राहिले आणि बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून अधिकाधिक रकमा उचलल्या. बँकांची सरकारी रोख्यांतील गुंतवणूक कमी झाली; त्यांचेजवळील रोख शिलकाहि तळाशीं गेल्या. ठेवींच्या मानानें कर्जे ज्यास्त झाल्याकारणानें बँकांची स्थिति कमी तरती राहिली. कर्जांसाठी मागणी वाढत राहिल्याकारणानें आणि पैसा अपुरा पडल्यामुळें ठेवींवरील व्याज अधिकाधिक आकर्षक करण्याची बँकांत चढाओढ लागून राहिली. त्यामुळें भांडवलाची किंमत बाजारांत चढीचीं राहिली.

**कर्जांत २५·५% वाढ**

शेड्यूल्ड बँकांच्या कर्जाची रक्कम १९५६ अखेर ७४५ कोटी रुपये होती. म्हणजे, १९५५ चे अखेरीच्या मानानें तीं १५१ कोटी रुपयांनीं किंवा २५·५% नीं जास्त होती. शेड्यूल्ड बँकांच्या एकूण कर्जांपैकी कारखान्यांना दिलेलीं कर्जे ३४·३% वरून ३८·५% वर गेलीं; व्यापारी कर्जे ५०·१% वरून ४७·५% वर उतरलीं.

**कर्जरोखे विकून रकमा कर्जांत गुंतवल्या**

बँकांच्या इनव्हेस्टमेंटमध्यें १८·२ कोटी रुपयांची घट झाली. त्यामुळें, इनव्हेस्टमेंटसचें ठेवींशीं प्रमाण ४२·३% वरून ३७·५% वर खालीं आलें. कर्जे देण्यासाठी बँकांनीं सरकारी रोखे विकून पैसा उपलब्ध करून घेतला.

**रोख शिलकांत घट**

बँकांकडील ठेवी वाढल्या, तरी त्यांची रोख शिलक व रिझर्व्ह बँकेंतील शिलक यांत घट झाली; त्यांची रक्कम १००·२ कोटी रु. ची ९०·५ कोटी रु. वर आली. ह्याचा अर्थ, आपल्या शिलका कमी करून त्याचा विनियोग बँकांनीं कर्जांकडे केला. रोख शिलकेचें ठेवींशीं प्रमाण १०·३% चें ८·९% झालें.

**मुदतीच्या ठेवींतील भ्रामक वाढ : तंगीचें निदर्शक**

शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींत ७९·८ कोटी रु. वाढ झाली; १९५५ मध्यें ही वाढ ८९·५ कोटी रु. होती. म्हणजे, ठेवींच्या वाढीची गती १०·१% वरून ७·९% वर आली. मुदतीच्या आणि चालू अशा दोन्हीं प्रकारच्या ठेवींत वाढ झाली, तरी मुदतीच्या ठेवींतील वाढ विशेष मोठी (४५·२ कोटी रु.) होती. मुदतीच्या ठेवींतील वाढ ही राष्ट्रीय उत्पन्नांतील सुधारणेचें एक निदर्शक आहे, त्याबरोबरच बँकांजवळील पैशाची तंगीहि त्यानें स्पष्ट होते. ह्या मुदतीच्या ठेवींत नोटिशीनें परत यावयाच्या कॉल मनीचाहि समावेश होतो; वास्तविक ह्या ठेवी चालू ठेवींच होत्या; उलट त्यावर व्याज मात्र जास्त होतें. पैशाच्या तंगीचा हा उत्कृष्ट पुरावा आहे

**ठेवींचे मानानें स्वत:च्या भांडवलांत वाढ नाहीं**

शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींचें देणें वाढलें, त्या मानानें त्यांच्या 'स्वत:च्या' फंडसमध्यें म्हणजे वसूल भांडवलांत व गंगाजळींत नाममात्र वाढ झाली. गेल्या वर्षांत वसूल भांडवल व गंगाजळी ह्यांत १·५ कोटी रुपयांची भर पडली; त्यांचें ठेवींशीं प्रमाण ६·६% वरून ६·२% वर उतरलें. गेल्या वर्षी गंगाजळी १·१ कोटी रु. नीं वाढली; वसूल भांडवलांत फक्त ४० लक्ष रुपयांची भर पडली.

**रिझर्व्ह बँकेकडून जास्त कर्जे घेतलीं**

शेड्यूल्ड बँकांनीं १९५६ मध्यें एकूण ९०४ कोटी रुपयांचीं कर्जे घेतलीं; १९५५ मध्यें त्यांनीं फक्त ४२५ रुपयांचीं कर्जे घेतलीं होतीं. १९५५ चे मानानें १९५६ अखेर रिझर्व्ह बँकेचीं फेडावयाचीं कर्जे ५९·३ कोटी रुपयांनीं वाढलीं; १९५५ मध्यें ती वाढ फक्त २०·४ कोटी रु. होती. बिल मार्केट योजनेखालील कर्जांवरील व्याजाचे दर दोनदां वाढवूनहि, त्या कर्जांसाठीं मागणी कायम राहिली. सरकारी रोख्यांचे तारणावर रिझर्व्ह बँकेनें दिलेलीं कर्जे १९५६ अखेर २१ कोटी रु. ची होती, तर बिल-मार्केट योजनेखालील कर्जे ६५ कोटी रुपयांचीं होतीं.

**नफ्यांत मरघोस वाढ**

२४ मोठ्या (५ कोटी रुपयांपेक्षा ज्यास्त ठेवी असलेल्या) हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या नफा-तोटा पत्रकांनीं उत्पन्न व निवळ नफा ह्यांत बरीच वाढ दर्शविली आहे. उत्पन्न ३७·० कोटी रुपयांचें ४३·७ कोटी रुपये झालें; एकूण खर्च ३१·० कोटी रुपयांचा ३६·० कोटी रु. झाला. म्हणजे, उत्पन्नाच्या प्रमाणांत खर्च वाढला नाहीं. त्या कारणानें निव्वळ नफा ६·० कोटी रुपयांवरून ७·७ कोटी रुपयांवर गेला.

(1) Trend and Progress of Banking in India during the year 1956.
(2) Statistical Tables relating to Banks in India for the year 1956.

## पैशाची तंगी

शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी, त्यांनीं दिलेलीं कर्जें आणि कर्जांचें ठेवींशीं प्रमाण ह्या संबंधांतील आंकडे खालीं दिले आहेत. त्यावरून असें दिसून येईल कीं, ठेवींतील वाढीच्या मानानें कर्जें अधिक वाढलीं आहेत.

व्यवहारांत खेळणाऱ्या चलनाचे मानानें शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी दुसऱ्या महायुद्धापूर्वी १२५%.होत्या; त्यांचें प्रमाण आतां ७५% वर उतरलें आहे. इतर देशांतील हीं प्रमाणें पुष्कळच मोठी असतात. (अमेरिका : ५००%, ग्रेटब्रिटन : ४००%) ह्याचा अर्थ असा, कीं चलनांत वाढ झाली तरी ती बँकांकडे आली नाहीं आणि बँकांची पत निर्माण करण्याची शक्ति इतर देशांतील बँकांचे मानानें कमी राहिली.

| वर्ष (शेवटचा शुक्रवार) | एकूण ठेवी (कोटी रु.) | एकूण कर्जें (कोटी रु.) | ठेवींशी कर्जांचें प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| १९५४ | ९३२·३१ | ५३८·४१ | ५७·८ |
| १९५५ | १०२२·३२ | ६३१·४५ | ६१·८ |
| १९५६ | ११०१·७५ | ७८८·४६ | ७१·६ |
| १९५७ : | | | |
| १८ जानेवारी | १११६·७५ | ८१५·८७ | ७३·१ |
| १५ फेब्रुवारी | ११३८·२० | ८६०·८२ | ७५·६ |
| १५ मार्च | ११६१·९० | ८७६·७१ | ७५·५ |
| १९ एप्रिल | १२१५·७६ | ९०१·३१ | ७४·१ |
| १७ मे | १२१९·५५ | ९३६·७३ | ७६·८ |
| १४ जून | १२४३·४८ | ९३०·२२ | ७४·८ |

### तुलनात्मक टक्केवारी

(एक्सचेंज बँका, इतर शेड्यूल्ड बँका व बिगर–शेड्यूल्ड बँका)

| कशाचें कशाचीं प्रमाण | % १९५५ | % १९५६ |
|---|---|---|
| रिझर्व्हजचें वसूल भांडवलाशीं | ८८ | ९० |
| डिमांड देण्याचें एकूण ठेवींशीं | ५८ | ५७ |
| टाइम देण्यांचें एकूण ठेवींशीं | ४२ | ४३ |
| वसूल भांडवल + रिझर्व्हजचें एकूण ठेवींशीं | ७ | ७ |
| बँकांनीं घेतलेल्या कर्जांचें एकूण ठेवींशीं | ५ | ९ |
| रोख + रिझर्व्ह बँकेंतील शिलकीचें एकूण ठेवींशीं | १० | ८ |
| सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीचें एकूण ठेवींशीं | ३८ | ३३ |
| एकूण इनव्हेस्टमेंटसचें एकूण ठेवींशीं | ४१ | ३७ |
| कर्जांचें एकूण ठेवींशीं | ६० | ६८ |

### जागतिक बँकेचें उत्पन्न

३० जून, १९५७ अखेर संपलेल्या वर्षी जागतिक बँकेला ३·६ कोटी डॉलर निव्वळ उत्पन्न झालें. त्यापूर्वीच्या वर्षी तें २·९ कोटी डॉलर होतें. गेल्या वर्षी बँकेनें १५ देशांना २० कर्जें दिलीं, त्यांची रक्कम ३८·८ कोटी डॉलर भरली. म्हणजे, ३० जून अखेरच्या कर्जांची रक्कम ३१० कोटी डॉलर झाली. बँकेच्या पटावर ६० सभासद–देश आहेत.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




कण आणि क्षण
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखक: – श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. २ रु. ८ आ.



खर्चांत बचत करा व पैसा शिलकींत टाका
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
जनता बचत योजना
व्याज : २½ टक्के

शाखा: फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.




किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

## किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९५७ असेर संपलेल्या वर्षी ९९,३८,५६४ रु. च्या मालाची विक्री केली. गेल्या वर्षीचा विक्रीचा आकडा ७१,७२,६५५ रु. होता. म्हणजे, विक्रीमध्यें सुमारें २८ लक्ष रुपयांची वाढ झाली. पूर्वीच्या वर्षीचा ४,८०,३६० रु. घसारा व अहवालाच्या वर्षाचा २,०९,१५३ रु. घसारा, असा एकूण ६,८९,५१३ रु. घसारा काढून, मॅनेजिंग एजंटसचें (किर्लोस्कर सन्स आणि कं.) १,२५,८७८ रु. कमिशन देऊन व वर्षाच्या नफ्यावरील करासाठी ४,०२,००० रु. तरतूद करून कंपनीला ३,३९,२१३ रु. नफा झाला. ९% डिव्हिडंडला २,१६,७८० रु. लागतील व कामगारांना त्यांच्या पगाराच्या १/६ इतका बोनस देण्यासाठी ७५,५४५ रु. लागतील. जनरल रिझर्व्हमध्यें १,४९,६३६ रु. घालण्यांत येतील. वरील आंकड्यांवरून कंपनीनें केलेल्या उत्कृष्ट प्रगतीची कल्पना येईल. चालू वर्षीहि उत्पादनक्षमता पूर्णपणें वापरली जात असून मागणी पुरी पाडणें कठीण जात आहे. तेव्हां ह्या वर्षाच्या असेरीचे हिशेब ह्याहिपेक्षा अधिक प्रगति दाखवितील, अशी अपेक्षा आहे. कंपनीचें वसूल भांडवल २४,१०,५१२ रु. असून रिझर्व्ह फंड आतां ४,५७,१०९ रु. चा झाला आहे. कर्जें ३९,०९,०८९ रु. चीं आहेत. म्हणजे, कमींत कमी भांडवलाचा वापर करून कंपनीनें भरपूर उत्पादन केलें आहे आणि उत्कृष्ट नफा मिळविला आहे.

---

## चलनवाढ

२ ऑगस्ट रोजीं संपलेल्या आठवड्यांत भारत सरकारनें १०३·३५ कोटी रुपयांचीं ट्रेझरी बिलें रिझर्व्ह बँकेस विकलीं. ह्या कागदी तारणाचे मोबदल्यांत चलनी नोटा सरकारनें मिळवल्या.

---

## फ्रान्स इजिप्तची कपास घेणार

फ्रान्समध्यें इजिप्तची कपास आयात होण्यास फ्रेंच सरकारनें परवानगी दिली आहे. गेल्या नोव्हेंबरमध्यें फ्रान्स व इजिप्त यांचेमधील व्यापार बंद पडला, तो पुनः सुरू होण्याची ही पहिली पायरी आहे.

---

## सुएझ कालवा कंपनीची नुकसानभरपाई

युनिव्हर्सल सुएझ कॅनॉल कंपनीनें इजिप्तकडे कंपनीच्या इजिप्तमधील मालमत्तेबद्दल १·५ कोटी पौंडांची मागणी केली आहे. ही रक्कम इजिप्तनें दिली, म्हणजे कंपनी कालव्याचें राष्ट्रीयीकरण करण्यास तयार होईल. कालवा कंपनीचा हा निरोप युनायटेड नेशन्सचे सेक्रेटरी-जनरल मि. हॅमरशोल्ड, ह्यांच्या करवीं इजिप्तच्या सरकारला पोंचविण्यांत आला. "कंपनीच्या मालमत्तेची नासधूस होऊन गेली आहे आणि ह्या नासधुशीस लष्करी आक्रमण कारण आहे; ह्या आक्रमणास कालवा कंपनीनें चालना देऊन पाठिंबा दिला होता," अशी इजिप्तची भूमिका आहे.

---

## दहा रुपयेवाल्या नव्या नोटा

रिझर्व्ह बँकेचे सध्यांचे गव्हर्नर, श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार, यांची सही असलेल्या १० रुपयेवाल्या चलनी नोटा लवकरच प्रचारांत येतील. अर्थात्, पूर्वीच्या गव्हर्नरांच्या सहीच्या नोटा चालू रहातीलच.

## पोस्टाच्या सदोष तिकिटाची किंमत वाढली

फ्रान्समधील १५ फ्रँक्सच्या कांहीं तिकिटांवर ५ फ्रँक्सचा आंकडा चुकून पडला आहे, हें तीं तिकिटें कांहीं प्रमाणांत विकलीं गेल्यानंतर लक्षांत आलें. तिकिटें जमविण्याचा छंद असणारे हीं 'बहुमोल' तिकिटें मिळविण्याकरितां भरमसाट किंमत देऊं करीत आहेत.

---

**श्री. कृष्ण मेनन ह्यांचें पुस्तक**—भारताचे संरक्षणमंत्री श्री. मेनन भारताच्या परराष्ट्रीय धोरणाविषयीं पुस्तक लिहीत आहेत. पुस्तकाला पंतप्रधान श्री. नेहरू प्रस्तावना लिहिण्याचा संभव आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपासून स्वीकारण्यांत आलेल्या परराष्ट्रीय धोरणासंबंधीं पुस्तकांत प्रामुख्यानें विवेचन असलें, तरी आर्थिक प्रश्नासारख्या इतर प्रश्नांनाहि जागा देण्यांत आली आहे.

**पाणीपुरठ्याची सहकारी योजना**—कोपरगांव तालुक्यांतील पुणतांबें गांवासाठी सहकारी पद्धतीची पाणीपुरवठ्याची योजना अंमलांत येणार आहे. योजनेसाठी एकूण खर्च सुमारें २ लक्ष ६२ हजार रुपये येईल. त्यांपैकी १५ हजार रुपये गांवकऱ्यांनीं जमविले आहेत. पाणीपुरवठ्याची अशा प्रकारची योजना मुंबई राज्यांतील पहिलीच ठरेल.

**फ्रेंच शास्त्रज्ञाचा इशारा**—सुप्रसिद्ध फ्रेंच शास्त्रज्ञ जोलिओ क्युरी ह्यांनीं अणुबॉंबच्या प्रायोगिक स्फोटाबद्दल धोक्याचा इशारा दिला आहे. त्यांच्या मतानें हे स्फोट चालू ठेवले गेल्यास, कित्येक लोकांना हाडाचा कॅन्सर होण्याची शक्यता वाढेल प्रयोगामुळें वातावरणांत मिसळलेल्या किरणोत्सर्गी विषारी द्रव्यांत वाढ होत आहे, असेंहि त्यांनी जाहीर केलें आहे.

**अणुशक्तीच्या साह्यानें वीज**—१९६० सालीं इटलींत रोम शहरांत ऑलिंपिक सामने व्हावयाचे आहेत. त्यावेळीं लागणाऱ्या विजेच्या शक्तीचा पुरवठा अमेरिकेनें उभारलेल्या अणुभट्टीच्या साह्यानें करण्यांत येणार आहे. पश्चिम युरोपांत रशिआबाहेर अणुभट्टीचा हा उपयोग प्रथमच करण्यांत येईल.

**आंध्रमधील वीजपुरवठ्याच्या योजना**—आंध्र राज्यांतील तेलंगण भागांतील पाटबंधाऱ्याच्या व वीजपुरवठ्याच्या संमिश्र योजना आणि आंध्र भागांतील पाणीपुरवठ्याच्या योजना ह्यांना नियोजनसमितीनें मान्यता दिली आहे. ह्या सर्व योजनांसाठी १९५७–५८ सालांत मध्यवर्ती सरकारकडून तीन कोटी रुपयांच्या कर्जाची मदत देण्यांत येणार आहे.

**कुत्र्यांचा विमा उतरण्याची व्यवस्था**—अमेरिकेंतील कुत्र्यांचा विमा उतरण्याची सोय आतां झाली आहे. ६ महिन्यांपासून ९ वर्षें वयाच्या कुत्र्यांचा जास्तींत जास्त ५ हजार डॉलर्सचा विमा उतरवितां येईल.

**साखर कामगारांना बोनस**—टिळकनगर येथील महाराष्ट्र शुगर मिल्स ह्या कारखान्यांतील सुमारें ३,००० हंगामी व कायम-कामगारांना १९५५–५६ सालाचें बोनस म्हणून ३॥ लाख रुपये मिळणार आहेत. बोनसची रक्कम ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत त्यांच्या हातांत पडेल.

**जगांतच तांदुळाची टंचाई आहे**—भारतामधील अन्नधान्याविषयीं चौकशी करण्यासाठी नेमलेल्या कमिशननें विहार, बंगाल व आसाम ह्या राज्यांचा दौरा पुरा केला आहे. देशांतील लोकांच्या खाण्याच्या संबंधांत बदल करण्यासाठी कमिशन शिफारसी करण्याचा संभव आहे. कमिशनचे अध्यक्ष श्री. अशोक मेहता म्हणाले कीं, तांदुळाचा तुटवडा जगभर आहे; आणि त्यांतच भारताच्या विदेशी चलनाच्या अडचणीची भर पडली आहे.

## मुंबईंत फक्त शेअर अँण्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशनला मान्यता

### सभासदत्वाचे नियम जाहीर झाले

भारत सरकारनें मुंबईला एकाच स्टॉक एक्स्चेंजला मान्यता देण्यांत यावी असें ठरविलें असून, ती शेअर अँण्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन (आतां स्टॉक एक्स्चेंज या नांवानें ओळखली जाणारी) या संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार 'दि इंडियन स्टॉक एक्स्चेंज' या संस्थेला सेक्यूरिटीजचा व्यवहार, वरील संस्थेला मान्यता दिल्यानंतर व सुरक्षा करार नियंत्रण कायद्याच्या कलम १३ च्या आधीन क्षेत्र जाहीर केल्यानंतर करता येणार नाहीं. परंतु दि इंडियन स्टॉक एक्स्चेंजच्या सभासदांना मान्यता—प्राप्त बॉंबे स्टॉक एक्स्चेंजच्या सभासदत्वाकरितां त्यांनीं विशिष्ट शर्ती व अटी पुऱ्या केल्यावर अर्ज करतां येतील.

### सभासदत्वाच्या अटी

त्या अटी खालीलप्रमाणें :—

(अ) ता. ६ ऑगस्ट १९५७ च्या पूर्वी १२ महिने इंडियन स्टॉक एक्स्चेंजचे ते सक्रिय सभासद असले पाहिजेत.

(ब) सुरक्षा करार नियंत्रण नियमाच्या (१९५७) नियम (१) मध्यें दिल्याप्रमाणें ते सभासद होण्यास पात्र असले पाहिजेत.

(क) त्यांना रु. १५,००० प्रवेश फी द्यावी लागेल. त्यांतले रुपये ६,००० अर्जासोबत व उर्वरित रु. ९,००० सहा महिन्यांच्या आंत भरावे लागतील व पूर्ण फी भरल्यानंतरच सभासद होतील. मात्र जे सभासद रु. ६,००० त्यांच्या सभासदत्वाची निवडणूक झाल्यानंतर १५ दिवसांचे आंतच भरतील, त्यांना आणखी रक्कम न भरतांच सभासद म्हणून मान्यता मिळेल.

(५) सभासदत्वाची ठेव म्हणून त्यांना रु. २०,००० भरावे लागतील. ही ठेव एकदम न भरतां आल्यास अर्जासोबत रु. ५,००० भरून त्यांना उर्वरित रक्कम रु. ५,००० च्या त्रैमासिक तीन हप्त्यांत पुरी करावी लागेल. ठेवीची रु. २०,००० ची रक्कम भरून होईतों संबंधित व्यक्ती केवळ नाममात्र सभासद म्हणून काम करूं शकतील.

(६) त्यांनीं ता. १५ ऑक्टोबर, १९५७ च्या पूर्वी अर्ज केला पाहिजे. योग्य प्रकारची या मुदतींत वाढ करणें व त्या तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार करणें मान्यता—प्राप्त स्टॉक-एक्स्चेंजच्या मंडळाकडे राहील.

---

### मोटार बसचा लंडन—कलकत्ता प्रवास

लंडनहून कलकत्ता येथें येण्यासाठी २१ इंग्रज स्त्री-पुरुष १७ एप्रिल रोजीं एका भाड्याच्या बसमधून निघाले होते. ही "दि इंडियामन" बस कलकत्त्याहून परत लंडनला सुखरूप पोंचली आहे. मि. गॅरो फिशर ह्यानें ह्या प्रवासाची सर्व योजना केली; त्यानेंच सर्वच्या सर्व २०,००० मैल बस हांकली. त्याच्या पत्नीनें जरूरीप्रमाणें उतारूंसाठी सैंपाकपाणी केलें. "भारतांतील डोंगराळ मुलुखांतील नागमोडी वळणें असलेले घाट चढणें-उतरणें सोपें आहे. पण सायकलस्वारांच्या नागमोडी वहातुकींतून मोटार हाकणें फार कठीण" असा मि. फिशर ह्यांना अनुभव आला.

### इतर देशांच्या चलनांचे मानानें रुपयाची मजबुती चांगली टिकली

स्विस फ्रँक वगळला, तर बाकीच्या सर्व देशांच्या चलनापेक्षा भारतीय रुपयानें गेल्या दहा वर्षांत आपली मजबुती अधिक चांगली राखली आहे, असा अभिप्राय "यु. स्टे. न्यूज अँड वर्ल्ड रिपोर्ट" नें व्यक्त केला आहे. गेल्या दहा वर्षांत अमेरिकन डॉलर २०% घसरला, ब्रिटिश पौंड एक-तृतीयांशानें खाली आला आणि फ्रेंच फ्रँक तर दोन-तृतीयांशानें उतरला. हिंदी रुपयांतील उतार १८% होता. स्विस फ्रँकची किंमत मात्र फक्त ११% नें खाली गेली.

---

### मुंबईच्या मंत्र्यांसाठी नव्या मोटारी

मंत्री आणि विधिमंडळांचे स्पीकर व चेअरमन ह्यांच्या उपयोगासाठी मुंबई सरकारनें ३,७३,१६३ रु. खर्चून १७ नव्या मोटरगाड्या खरीदल्या आहेत. जुन्या गाड्या गेलीं पांच वर्षे वापरांत असल्यानें त्यांना वारंवार दुरुस्ती लागत असे.

---

### आयसेनहॉवरसाठी मासे आकर्षून ठेवणार

प्रेसिडेंट आयसेनहॉवरला मासे पकडण्याचा मोठा छंद आहे. न्यू पोर्टला तो लवकरच जाणार आहे, त्यावेळीं त्याला हवे ते मासे तेथें जमा व्हावेत ह्याकरितां पाण्यांत कांहीं माशांचे मुद्दाम तुकडे करून टाकण्यांत आले आहेत. सी पर्च आणि ब्ल्यू फिश ह्या जातीचे मासे त्यामुळें आकर्षित होतील. प्रेसिडेंट आयसेनहॉवरच्या सोईसाठी अशा रीतीनें मुद्दाम व्यवस्था करणें अनिष्ट आहे, अशी तक्रार "ऱ्होड आयलंड लीग ऑफ सॉल्ट वॉटर फिशरमेन" ह्या संस्थेनें तार करून आयसेनहॉवरला व्हाइट हाउसमध्यें कळविली आहे. गव्हर्नर किंवा व्हाइसरॉय शिकारीला आले, म्हणजे त्यांचेसाठी सावजें तयार ठेवण्याची आपल्या संस्थानिकांची पद्धति होती, त्यांतलाच अमेरिकेंतला हा प्रकार आहे.

---

### साखरेच्या पोत्यांत १०० किलोग्रॅम साखर

येत्या नोव्हेंबरांत सुरू होणाऱ्या साखरेच्या मोसमापासून साखर कारखाने दशमान पद्धतीनें साखरेचीं पोतीं भरूं लागतील. म्हणजे, प्रत्येक पोतें १०० किलोग्रॅम वजनाचें राहील. सध्यांचे पॅकिंग २ मण, ३० शेरांचें असतें. म्हणजे, नवें पोतें ३ शेरांनीं कमी भरेल. पोत्याची किंमत त्या प्रमाणांत अर्थातच कमी होईल.

---

### मध्यवर्ती सरकारच्या कर्जाचा भरणा

मध्यवर्ती सरकारच्या कर्जास १०५·९७ कोटी रुपये मिळाले. त्यांपैकीं ४४·९९ कोटी रुपये कन्व्हर्शनचे असुन बाकीची रक्कम रोखीची आहे. ३½% १९६७ नॅशनल प्लॅन बॉंड्सच्या वांट्याला ५६·९२ कोटी रु. व ४% १९७२ कर्जाच्या वांट्याला ४९·०५ कोटी रु. आले.

---

### विनोदमूर्ति ऑलिव्हर हार्डी ह्या नटाचें निधन

लॅरेल-हार्डी ह्या रड्या जाड्याच्या जोडींपैकी ऑलिव्हर हार्डी हा जाड्या नट ७ ऑगस्ट रोजीं मृत्यु पावला. त्यावेळीं त्याचें वय ६५ वर्षांचें होतें. हार्डी हा अमेरिकन व त्याचा जोडीदार स्टॅन लॅरेल हा इंग्रज होता. १९२७ सालीं त्यांची जोडी जमली व त्या दोघांनीं मिळून २०० विनोद चित्रपट केले. गेल्या सप्टेंबरमध्यें त्याला वाताचा झटका आला, तेव्हांपासून अखेरपर्यंत त्याची वाचा बंद होती.

# पहिल्या पंचवार्षिक योजनेचें पुनर्विलोकन

## (२)

### ग्रामोद्योग व छोटे उद्योगधंदे

पहिल्या पंचवार्षिक योजनेनें ग्रामोद्योग व छोटे धंदे यांच्या राष्ट्रीय नियोजनांतील स्थानांवर लक्ष केंद्रित केलें. योजनेंत याबाबत जाहीर केलेलीं उद्दिष्टें गांठलीं गेलीं नसलीं तरी छोट्या उद्योगधंद्यांना राष्ट्रीय नियोजनांत आतां निश्चित स्थान मिळालेलें असून त्यांच्या विकासाचा अधिक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम पार पाडण्याच्या दृष्टीनें पूर्वतयारी झालेली आहे. ग्रामोद्योग आणि छोटे धंदे यांवर एकूण ४६ कोटी रु. खर्च झाला. त्यांपैकी १२ कोटी रु. खर्च राज्य सरकारांनीं केला. मध्य सरकारच्या ३४ कोटी रु. खर्चापैकीं हातमाग व खादी यांवर प्रत्येकी १२ कोटी रु., छोटे उद्योगधंदे ४ कोटी रु. आणि ग्रामोद्योग ३ कोटी रु. याप्रमाणें खर्च झाला.

### सहकार

सहकारी कर्जासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेंत एकूण १३५ कोटी रु. ची तरतूद करण्यांत आली होती. प्रत्यक्ष वांटप मात्र केवळ ८० कोटी रु. च झालें. यांतील मुख्य दोष असा कीं, सहकारी चळवळ अद्यापि पुरेशा विस्तृत पायावर उभी राहिली नसून कर्जविषयक तरतुदीची सांगड शेतकीचें उत्पादनांतील वाढ आणि सहकारी बाजारपेठ योजना यांचेशीं नीट घातली गेलेली नाहीं. राष्ट्रीय विस्तारयोजना आणि समाजविकास योजना यांमुळें मात्र ग्रामीण भागांत सहकारी चळवळीची वाढ जनतेची चळवळ म्हणून होईल अशी परिस्थिति निर्माण झाली आहे.

### राष्ट्रीय उत्पन्न

योजनेच्या पांच वर्षांत राष्ट्रीय उत्पन्न सुमारें १७·५ टक्क्यांनीं वाढलें. राष्ट्रीय उत्पन्न वाढण्याचें प्रमाण समाधानकारक असलें तरी त्याचा वेग सारखा राहिला नव्हता. मुख्यतः शेतकी उत्पादनांत वाढ झाल्यानें १९५३–५४ व १९५४–५५ मध्यें राष्ट्रीय उत्पादनांत बरीच वाढ झाली. परंतु नंतरच्या दोन वर्षांत या वाढीचें प्रमाण कमी झालें, इतकेंच नव्हे तर १९५५–५६ मध्यें त्यांत नाममात्र वाढ झाली. योजनेच्या काळांत दरडोई उत्पन्न १०·५ टक्क्यांनीं वाढलें.

राष्ट्रीय उत्पन्नांतून भांडवल गुंतवणुकीचें प्रमाण ५ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर, म्हणजे एकूण ३५०० ते ३६०० कोटी रु. पर्यंत नेण्याचें ठरलें होतें. प्रत्यक्षांत सरकारी क्षेत्रांत १५०० कोटी रु. व खाजगी क्षेत्रांत १६०० कोटी रु. मिळून एकूण ३१०० कोटी रु. ची भांडवल गुंतवणूक या काळांत झाली. देशाच्या आर्थिक व्यवस्थेंत भांडवल गुंतवणुकीची पातळी १९५०–५१ पेक्षा दुप्पटीनें वाढली.

योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत विकास कार्यक्रमावरील खर्चाचें प्रमाण कमी होतें तें तिसऱ्या वर्षापासून हळुहळु वाढत गेलें. विशेषतः शेवटच्या दोन वर्षांतील खर्च पांच वर्षांतील एकूण खर्चाच्या २/३ इतका होता. सरकारी क्षेत्रांतील एकूण भांडवल गुंतवणुकीपैकी ५० टक्के भांडवल अखेरच्या दोन वर्षांत गुंतविण्यांत आलें. याच कालांत खाजगी क्षेत्रांतील भांडवलाची बरीच वाढ झाली.

योजनेच्या उत्तरार्धांत राष्ट्रीय उत्पादनाचें प्रमाण कमी झालें तर भांडवल गुंतवणुकींत मात्र सतत वाढ होत होती. यावरून एकूण भांडवल गुंतवणूक आणि उत्पादनांत वाढ या दोहोंचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करतां येत नाहीं असें या अहवालांत निदर्शनास आणण्यांत आलें आहे. या सर्व गोष्टींवरून असें दिसून येतें कीं, पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील प्रगति प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायद्यांचा विचार करतां समाधानकारक असली तरी ती एक पूर्ण झालेली व्यवस्था नसून विकास सुरू होण्याची प्रथमावस्था आहे, असें या अहवालांत म्हटलें आहे.

### एकूण खर्च

मध्यवर्ति सरकार आणि राज्य सरकारें यांनीं दोघांनीं मिळून योजनेवर एकूण २,०६९ कोटी रु. खर्च करावे असें १९५२ मध्यें तयार करण्यांत आलेल्या योजनेनुसार ठरविण्यांत आलें होतें. नंतर योजनेची व्याप्ति वाढविण्यांत येऊन एकूण खर्चामध्यें सुरवातीच्या वर्षापेक्षा वाढ करून रोजगाराच्या संधी जास्त प्रमाणांत उपलब्ध करून देण्याचे हेतूनें त्यांत विविध फेरफार करण्यांत आले. हे फेरफार केल्यामुळें योजनेवर २,३७८ कोटी रुपये खर्च करण्याचें ठरलें. यांपैकी भारत सरकारनें १,३९० कोटी रुपये व इतर सर्व राज्यांनीं मिळून ९८८ कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें. ह्या दुरुस्त केलेल्या अंदाजांतील आंकड्यांशीं तुलना करतां भारत सरकार आणि राज्य सरकारें यांचे योजनेवर अंदाजें एकूण २०१२ कोटी रुपये खर्च झाला असून त्यांपैकी भारत सरकारनें सुमारें १,११५ कोटी रुपये आणि राज्य सरकारांनीं सुमारें ८९७ कोटी रुपये खर्च केले असा अंदाज आहे. (पहिल्या चार वर्षांच्या आणि पांचव्या वर्षासाठी दुरुस्त केलेल्या अंदाजाच्या हिशेबानुसार हे आंकडे देण्यांत आले आहेत.) प्रत्यक्ष खर्च व दुरुस्त अंदाज यांमध्यें नेहमींच पडणारी तफावत लक्षांत घेऊन १९५५–५६ च्या दुरुस्त अंदाजापेक्षा कमी प्रमाणांत प्रत्यक्ष खर्च धरूनसुद्धां योजनेवर प्रत्यक्षांत एकूण १९६० कोटी रुपये खर्च झाले असावेत. भारत सरकार आणि राज्य सरकारें यांच्या योजनेवरील खर्चाच्या प्रमाणांत उल्लेखनीय प्रगति झाली. भारत सरकारनें १९५५–५६ साठीं १९५१–५२ च्या जवळजवळ तिप्पट, खर्च योजनेवर केला तर राज्य सरकारांनीं योजनेच्या पहिल्या वर्षी केलेल्या खर्चाच्या दुप्पटीहून अधिक खर्च केला.

### योजनेला लागणारा पैसा उभारण्याचे मार्ग–छोटी बचत

योजनेच्या काळांत छोट्या बचतींनें पैसा उभारण्याच्या कार्यांतहि हळूहळू वाढ होत असल्याचें दिसून आलें. छोट्या बचतींतून २२५ कोटी रुपये उभें करण्याचें ठरलें होतें. तरी प्रत्यक्षांत २१७ कोटी रुपये जमा झाले. १९५०–५१ मध्यें छोट्या बचतीद्वारें जमा झालेल्या रकमेच्या दुप्पट रक्कम योजनेच्या शेवटीं जमा झाली आणि योजनेच्या काळांत खर्च करण्यांत आलेल्या रकमेपैकी १२ टक्के रक्कम छोट्या बचतींतून उभारण्यांत आलेल्या पैशांतून खर्च करण्यांत आली, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. छोट्या बचतीप्रमाणेंच प्रॉव्हिडंट फंड आणि इतर तत्सम अल्पकालीन कर्जे याद्वारें ६७ कोटी रुपये योजनेच्या काळांत उभारण्यांत आले.

छोटी बचतयोजना अद्याप ग्रामीण विभागांत आणि नगरभागांतील खरोखरीच छोटी बचत करणाऱ्या लोकांपर्यंत पोहोंचावयाची आहे, ह्या गोष्टीकडे अहवालांत लक्ष वेधण्यांत आलें आहे. विकासकार्याच्या वाढणाऱ्या वेगाबरोबरच सरकारी महसुलांत वाढ झाली पाहिजे हें तर खरेंच, पण त्याबरोबरच मागासलेल्या देशांतील योजना यशस्वी करण्यासाठी छोट्या बचतीची सुसूत्र

देशव्यापी योजना असणें ही प्राथमिक महत्त्वाची गोष्ट आहे हें आग्रहपूर्वक सांगणें जरूर आहे.

सरकारी क्षेत्रांतील विकास कार्यासाठी योजनेच्या काळांत एकूण २९६ कोटी रुपयांचें परकीय साह्य (कर्जें आणि मदत) मिळालें. यांपैकी सुमारें १८८ कोटी रुपये पांच वर्षांत खर्च करण्यांत आले असून १०८ कोटी रुपये पुढील योजनेसाठी ठेवण्यांत आले आहेत.

पहिल्या पंचवार्षिक योजनेवर खर्च झालेली १९६० कोटी रुपयांची (५ व्या वर्षाच्या प्रत्यक्ष अंदाजानुसार) रक्कम कोणत्या मार्गांनीं उपलब्ध झाली तें खालील तक्त्यांत दिलें आहे.

| | आंकडे (कोटी रुपयांचे) | एकूण टक्केवारी |
|---|---|---|
| (अ) कर आणि रेल्वेकडील जादा शिल्लक | ७५२ | ३८ |
| (ब) बाजारपेठांतून उभारलेलीं कर्जें | २०५ | १० |
| (क) छोटी बचत आणि अल्पकालीन कर्जें. ... | ३०४ | १६ |
| (ड) इतर भांडवली उत्पन्न ... | ९१ | ५ |
| (इ) परदेशांकडून मिळालेलें साह्य | १८८ | १० |
| (ई) तुटीचा अर्थभरणा ... | ४२० | २१ |
| | १,९६० | १०० |

राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा वांटा सरकारी तिजोरींत कसा आणावा, हा अर्थव्यवस्थेचा विकास करण्यांतील प्रमुख प्रश्न आहे ही गोष्ट ह्या अहवालांत निदर्शनास आली आहे. योजनेच्या अखेरच्या काळापर्यंत ह्या दिशेनें थोडीशीच सुरुवात झाली आहे असें म्हणतां येईल.

किंमतमानाकडे वळून अहवाल म्हणतो कीं, १९५३–५४ मध्यें किंमतींत झालेल्या चढउतारानंतर त्या घसरूं लागल्यानें, विशेषतः अन्नधान्यें आणि शेतमालाच्या किंमती टिकवून धरण्यासाठी सरकारनें उपाययोजना केली. त्यानंतर जुलै १९५५ पासून किंमतमानांत निश्चित वाढ होऊं लागली व तेव्हांपासून योजनेच्या अखेरच्या कालापर्यंत त्यांत सुमारें १४ टक्क्यांनीं वाढ झाला. तेव्हांपासून किंमतमानांत होणाऱ्या वाढीवरून अपुऱ्या पुरवठ्याच्या परिस्थितींतहि मागणी वाढत आहे ही गोष्ट ह्यावरून दिसून येतें. योजनेच्या मध्यकाळांत उत्पादनांत वाढ झाल्यामुळें योजनेंतील विकासकार्यक्रमांचा देशाच्या आर्थिक व्यवहारावर एकंदरींत जाणवण्याइतका ताण पडला नाहीं. परंतु १९५६ च्या सुरुवातीस मात्र आर्थिक परिस्थिति जवळ जवळ ताणली गेली असें ह्या अहवालांत म्हटलें आहे.

### बँकांची साखर कारखान्यांना कर्जें

रिझर्व्ह बँकेनें, साखर कारखान्यांना बँकांनीं द्यावयाच्या कर्जांवर गेल्या महिन्यांत नियंत्रणें घातलीं होतीं, तीं आतां काढून घेण्यांत आलीं आहेत. साखरेच्या व्यापारावरील बंधनें मात्र कायम ठेवण्यांत आलीं आहेत. साखर कारखान्यांवरील नियंत्रणामुळें कारखान्यांच्या कामास अडथळा येईल; शिवाय कारखान्यांतील साखरेच्या विक्रीवर सरकारचें नियंत्रण असल्याकारणानें बँकांच्या कर्जांचा साठेबाजीकडे उपयोग करतां येण्याजोगा नाहीं, असें कारखानदारांनीं दाखवून दिलें. तें रिझर्व्ह बँकेस पटलें व २९ जून रोजीं लादलेलीं नियंत्रणें साखर कारखान्यांना लागू राहूं नयेत, असें रिझर्व्ह बँकेनें बँकांना कळविलें आहे.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड

—शेड्यूल्ड बँक—

- धंदा लहान असो अगर मोठ्या प्रमाणावर असो, पैशाची जरुरी सर्वांना भासते. बँकेकडून योग्य तारणावर कर्ज मिळूं शकतें.
- तसेंच, बँक अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारते.
- व्याजाच्या दराबद्दल अगर माहितीकरितां मुख्य ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांना भेटावें अगर लिहावें.

—शाखा—

(१) सदाशिव पेठ, पुणें.
(२) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
(३) सांगली.

मुख्य ऑफिसः—
४५५ रविवार पेठ,
पुणें २.

गो. गं. साठे
मॅनेजर

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल
भागीदारांतर्फे रु. ३५,२३,७००
मुंबई सरकारतर्फे रु. २६,००,०००
रु. ६१,२३,७००
गंगाजळी व फंड रु. ६१,८३,९००
ठेवी रु. १०,७९,८८,०००
खेळतें भांडवल रु. १३,३५,२४,०००

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.